CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २९४ वा ▶ रविवार दि. २० ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६

महाराष्ट्रात पत्रकारिता जिवंत ठेवा : राज ठाकरे

पुणे । पिंपरी येथे पत्रकारांच्या गौरव समारंभात राज ठाकरे बोलत होते. यावेळी त्यांनी पत्रकारितेवर परखड भाष्य केले. राज ठाकरे

म्हणाले, अजित पवारांवर आरोप करणाऱ्या भाजपने त्यांना आपल्यासोबत घेतले. पूर्वी असे घडले असते तर पत्रकारांनी अजित पवारांना तास तास तासले असते. मात्र, आता त्यांच्या उत्तरावर पत्रकार हसतात कसे, हे मला समजतच नाही. यावेळी पत्रकारांना राज ठाकरेंनी आवाहन केले की, बाबांनो आला दिवस पुढे ढकलायचा. एखादी काही तरी बातमी घेऊन यायची, अशी कामे करू नका. पत्रकारांवर नाराजी व्यक्त केली.

न्यूज कॉलम

निजामपूर येथे दोघांना मारहाण

धुळे । वाढदिवसासाठी मंगल कार्यालय दिले नाही म्हणून संतप्त सहा जणांनी लोखंडी फाइटने मारहाण केल्याने नीलेश रामदास जयस्वाल, लक्ष्मीकांत शहा (रा. निजामपूर, ता. साक्री) जखमी झाले. या घटनेत तीस हजारांची रोकड बळजबरीने काढून घेण्यात आली. या प्रकरणी निजामपूर पोलिस ठाण्यात संशयित ईश्वर कृष्णा न्याहळदे, शरद रघुनाथ पेंढारे, संदीप भगवान भलकारे ऊर्फ संभा (रा. जैताणे, ता. साक्री), विनोद अरुण भावसार, परेश चंद्रकांत पाटील व विशाल रमेश विसपुते यांच्याविरुद्ध मारहाण व दरोड्याचा गुन्हा दाखल झाला. या संदर्भात म्हसाईमाता पतसंस्थेचे व्यवस्थापक नीलेश जयस्वाल यांनी फिर्याद दिली.

लळिंग गावाजवळ रिक्षा पकडली

धुळे । बेकायदेशीर गोमांस वाहतूक करीत असल्याच्या संशयावरून पोलिसांनी रिक्षा (एमएच ४१, एटी १६७३) ची तपासणी केली. त्यात गोमांस आढळले. या प्रकरणी दुर्गेश जितेंद्र चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार रिक्षाचालक सईस इलियास सईस हसूफ (रा. इस्लामपुरा, मालेगाव), जलील इब्राहिम शेख या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

ब्राह्मण समाजात शिवाजी, संभाजी नावे ठेवत नाहीत : भुजबळांचा भिडेंना टोला

नाशिक । प्रतिनिधी

महापुरूषांबद्दल तसेच ऐतिहासीक घटनांबाबत वारंवार वादग्रस्त विधान करणारे संभाजी भिडे यांच्यावर मंत्री छगन भुजबळ यांनी टीका केली आहे. ब्राम्हण समाजात शिवाजी, संभाजी अशी नावं ठेवत नाहीत, अशा शब्दांत भुजबळांनी त्यांच्यावर निशाणा साधला आहे. नाशिकमधील मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या 'समाज दिन' कार्यक्रमात भुजबळ मार्गदर्शन करत होते. याप्रसंगी पुढे बोलताना ते म्हणाले की, काही लोक म्हणतात तुम्ही इकडे तिकडे गेलात. पण आम्ही कुठेही गेलो तरी शाहू-फुले-आंबेडकरांचा वारसा अजिबात सोडणार नाही.

कर्मवीर रावसाहेब थोरात यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने मविप्र संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी १९ ऑगस्ट समाजदिन म्हणून साजरा करण्यात येतो. या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात मविप्र संस्थेच्या अनेक शाळा, महाविद्यालयात समाज दिन साजरा करण्यात येत आहे. याच निमित्ताने मंत्री छगन भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मखमलाबाद शाळेच्या प्रांगणात पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. छगन भुजबळ म्हणाले की, समाजाच्या विकासासाठी शिक्षण हे अतिशय महत्वाचे असून शिक्षणाच्या प्रश्नावर सर्वांनी जातिभेद, मतभेद दूर करत सर्व समाजाने एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता आहे. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी योगदान देणारे सर्व महापुरुष आपल्या सर्वांची दैवत असली पाहिजे, असे सांगत आपण कुठेही गेलो तरी त्यांचे विचार कदापिही सोडणार नाही, असे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी दिलेला सत्यशोधक समाजाचे विचार रुजवण्यासाठी अनेक कार्यकर्ते निर्माण झाले. त्यांनी समाजात हे विचार रुजवले आजही त्या विचारांवर संस्थांचे काम सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. बहुजन समाजाला शिक्षण मिळण्यासाठी महात्मा फुले यांनी वाचा फोडली. पुढे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण मिळून देण्याचं काम केलं. त्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड, इंदूरचे होळकर, धार संस्थानचे श्रीमंत उदाजी पवार महाराज आदींनी सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाची आवश्यकता विशद करून कृतिशील पावले टाकली असल्याचे त्यांनी सांगितले.

या महापुरुषांच्या विचारांतून प्रेरणा घेत जनतेचे कल्याण आणि आनंदासाठी सामाजिक हेतू जागृत करण्याचे कार्य डोळ्यासमोर ठेवून सामाजिक बांधिलकीतून कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर काकासाहेब वाघ, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर डी. आर. भोसले, कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे, कर्मवीर गणपतदादा मोरे आदी समाजधुरिणांनी १९१४ मध्ये मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. शेतकरी, आदिवासी, बहुजन समाजाला शिक्षित करणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. अनेकांच्या समर्पण, त्याग व योगदानातून ही संस्था यशोशिखरावर गेली असल्याचे छगन भुजबळ यांनी सांगत त्यांना अभिवादन केले.

इतिहास मोडणाऱ्यांविरुद्ध उभे राहावे लागेल

संभाजी भिडेंचं खरं नाव मनोहर कुलकर्णी आहे. पण लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी खरंतर ब्राह्मण समाजानं वाईट वाटून घेण्याचं कारण नाही. पण कुठल्याही ब्राह्मण घरामध्ये कोणीही शिवाजी, संभाजी नाव ठेवत नाहीत. हा माणुस उठूनसुठून कुणावरही टीका करत असतो. त्यामुळं इतिहास मोडणाऱ्यांविरोधात आपल्याला उभं राहावं लागेल.

सरस्वतीचा अवमान करणे योग्य नाही, दादा भुसेंचे स्पष्टीकरण

फुले-शाहू-आंबेडकर यांना पुजलेच पाहिजे. मात्र यात माता सरस्वतीचा अवमान करणे बरोबर नाही. भारत देश हा हिंदू दैवताना मान्य करणारा असून कुणाच्या भावनांना ठेच लागेल असं बोलू नये, असा सल्ला पालकमंत्री दादा भुसे यांनी दिला आहे.

आम्ही सत्तेत आलो कारण फुलेंनी तेच सांगितले

राजक्रांतीकारकांपासून समाजक्रांतीकारकांपर्यंतचा आपला इतिहास आहे त्यांचा आदर आपण जपला पाहिजे. आम्ही सत्तेत का सामिल झालो हे मी आधीही सांगतलं आहे. महात्मा फुलेंनी सांगितलं होतं की, सत्तेविना झाल्या सर्व कळा अवकळा. तसेच बाबासाहेबांनी देखील सांगितलं होतं शिका आणि सत्तेत सामिल व्हा. बाबासाहेब सत्तेत सामिल झाले आणि आपल्याला संविधान मिळालं

आपले देव ओळखायला शिका

आपल्याला शिक्षण दिले ते महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज आणि कायद्यात ज्याचं पूर्ण रुपांतर केलं ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यानंतर भाऊराव पाटील आणि नंतर रावसाहेब थोरात यांनीच आपल्याला शिक्षणाची दारं उघडी करुन दिली. पण कुणाला सरस्वती, शारदा आवडते पण आम्ही काही यांना कधी पाहिलं नाही. आम्हाला काही त्यांनी शिक्षण दिलं नाही. पण आम्हाला ज्यांनी शिक्षण दिलं ते या लोकांनी दिलं म्हणून ते माझे देव आहेत. तेच देव तुमचे असले पाहिजेत, असेही वादग्रस्त विधान पुन्हा भुजबळांनी केले आहे.

धुळे जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांचा जीव टांगणीवर

आमदार सत्यजीत तांबेंचं मुख्यमंत्र्यांना पत्र

मुंबई । प्रतिनिधी

एकीकडे जिल्हा परिषदेच्या शाळा डिजिटल करण्यासाठी प्रयत्न होत असताना दुसऱ्या बाजूला धुळे जिल्ह्यातील तब्बल ४६९ शाळांची पडझड झाली असून परिस्थिती धोकादायक आहे. त्यामुळे हजारो विद्यार्थी दर दिवशी जीव मुठीत घेऊन शिक्षण घेत असल्याची बाब आमदार सत्यजीत तांबे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री व ग्रामविकास विभाग यांच्या निदर्शनास आणली आहे. या शाळांच्या डागडुजीसाठी लागणारा निधी लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावा आणि शाळांची दुरावस्था दूर करावी, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षणाचा दर्जा उत्तम असतो. तसंच या शाळांमधील शिक्षणाचा खर्च परवडणारा असल्याने या शाळा खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांच्या शाळा मानल्या जातात. सरकारनेही या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी आणि आधुनिक युगाशी या शाळांचा मेळ बसवण्यासाठी त्या डिजिटल करण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. या सर्व गोष्टी कौतुकास्पद असल्या तरी, या शाळांच्या इमारतींकडेही लक्ष देण्याची गरज आहे, असं मत नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजीत तांबे यांनी व्यक्त केलं. धुळे जिल्ह्यातील तब्बल ४६९ शाळांमधील वर्गखोल्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे. या शाळांच्या डागडुजीसाठी आवश्यक तो निधी वारंवार विनंती करूनही मिळालेला नाही. हा निधी लवकरात लवकर मिळावा आणि दुरूस्तीचं काम त्वरीत पूर्ण करावं, अशी विनंती तांबे यांनी केली.

दुर्घटनेची वाट बघू नका

धुळे जिल्ह्यातल्या शाळांच्या या दुरावस्थेबाबत याआधीही बरंच काही बोललं गेलं आहे. वारंवार विनंती करूनही डागडुजीसाठी निधी उपलब्ध होत नसेल, तर ते खरंच दुर्दैवी आहे. आता पावसाचे दिवस आहेत. अशात आधीच डळमळीत असलेल्या एखाद्या शाळेची इमारत कोसळून काही दुर्घटना घडू शकते. त्यानंतर मदत उपलब्ध झाली, तर त्याला काहीच अर्थ नसेल. त्यामुळे मुख्यमंत्र्यांना आणि ग्रामविकास विभागाला माझी विनंती आहे की, असा गंभीर अपघात घडण्याआधीच निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सत्यजीत तांबे यांनी केली.

शिंदखेडा रेल्वे स्थानकावर सुपरफास्ट रेल्वे गाड्यांना थांबा देण्याची मागणी

रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांना निवेदन

शिंदखेडा । प्रतिनिधी

शिंदखेडा रेल्वे स्थानकावर सुपरफास्ट रेल्वे गाड्यांना थांबा देण्यात यावा यासाठी शिंदखेडा तालुका भाजपा प्रवाशी आघाडी तर्फे रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील हे शिंदखेडा रेल्वे स्थानकावर आले असता त्यांना निवेदन देण्यात आले.

शिंदखेडा शहर हे तालुक्याचे मध्यवर्ती रेल्वे स्थानक असून या रेल्वे स्थानका जवळ शिरपूर, धुळे ,नरडाना, चिमठाणे अशी मोठी गाव आहेत गावाचे प्रवाशी मोठ्या संख्येने नियमित प्रवास करतात. यामुळे शिंदखेडा रेल्वे स्थानकावर पुरी अहमदाबाद , प्रेरणा एक्सप्रेस, भागलपूर सुरत एक्सप्रेस, बैरोनी एक्सप्रेस, अहमदाबाद सप्ताहिक एक्सप्रेस, हिंसार एक्सप्रेस , बांद्रा पटणा एक्सप्रेस, उधना बनारस एक्सप्रेस यांना थांबा देऊन. पुणे शिंदखेडा पुणे पुणे प्रवाशी एक्सप्रेस व्हाया दोंडाईचा - नंदुरबार - नवापूर - बेस्थान - कल्याण - लोणावडा पुणे अशी सुरु करावी. अमरावती सुरत एक्सप्रेस गाडी नियमित सुरु करावी . नंदुरबार पॅसेंजर गाडी सुरत स्टेशन पर्यंत पूर्ववत सुरु करावी या मागणीचे निवेदन देण्यात आले.

निवेदनावर गटनेते तथा नगरसेवक अनिल वानखेडे, भाजपा प्रवाशी आघाडी अध्यक्ष गोविंद मराठे, मा.उपनगराध्यक्ष प्रकाश देसले, भिला पाटील, उल्हास देशमुख, मा. नगरसेवक राहुल महिरे,मा. पं स.सदस्य प्रकाश चौधरी, मराठा समाज अध्यक्ष राजेंद्र मराठे, देविदास माळी, सुभाष माळी, विनोद पाटील, मनोहर पाटील, मा. नगरसेवक किसन सकट यांच्या सह्या आहेत.

मुलभूत सोयी-सुविधांच्या उभारणीसाठी ९ कोटी ६० लाखांच्या निधीला मंजूरी

नाशिक । प्रतिनिधी

शहरातील विविध प्रभागांमध्ये नागरिकांना मुलभूत सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी खा. हेमंत गोडसे यांच्याकडून सुरू असलेल्या सततच्या प्रयत्नांना यश आले आहे. राज्याच्या नगरविकास विभागाने शहरवासीयांना मुलभूत सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी लेखाशीर्ष अंतर्गत नऊ कोटी साठ लाखांच्या निधीला मान्यता दिली आहे. या निधीतून शहरातील सर्वच प्रभागांमध्ये मुलभूत सोयी-सुविधांची उभारणी होणार असून लवकरच या विकास कामांचा प्रारंभ होणार असल्याची माहिती खा. हेमंत गोडसे यांनी दिली आहे.

शहरात महापालिका प्रशासनाकडून सतत विकास कामे होतच असतात. महापालिका क्षेत्रात मुलभूत सोयी-सुविधा होणेकामी राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडून निधी उपलब्ध होणेकामी शहरातील नगरसेवकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून खा. हेमंत गोडसे यांच्याकडे आग्रही मागणी होत होती. शहरवासीयांची मागणी न्यायिक असल्याने शासनाच्या नगरविकास विभागाकडून निधी उपलब्ध होण्यासाठी गेल्या काही महिन्यांपासून खा. गोडसे प्रयत्नशील होते.

दरम्यानच्या काळात खा. गोडसे यांनी मुख्यमंत्री. एकनाथ शिंदे यांची भेट घेत शहरात मुलभूत सोयी-सुविधा उभारणीसाठी दहा कोटी रूपयांचा निधी तातडीने उपलब्ध करून देण्याचे साकडे घातले होते. खा. हेमंत गोडसे यांच्या सततच्या प्रयत्नांना यश आले असून नगरविकास विभागाने शहरात सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी नऊ कोटी साठ लाखांच्या निधीला काल मान्यता दिली आहे.

सांगवीतील दंगलीची सीबीआय चौकशी करा

युवकांवरील गुन्हेही मागे घेण्याची मागणी

शिरपूर । प्रतिनिधी

सांगवीतील दंगलीनंतर आदिवासी युवकांवर अन्याय होत असल्याचे सांगत विविध आदिवासी संघटनांतर्फे शुक्रवारी धुळे येथे मोर्चाचे आयोजन केले होते. मात्र, मोर्चाला परवानगी नाकारल्याने निवडक पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांच्या कार्यालयात जाऊन निवेदन दिले.

त्यात म्हटले आहे, की सांगवी येथे विश्व आदिवासी दिनानिमित्त आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमा असलेले बॅनर्स १० ऑगस्टला चारण समाजातील लोकांनी फाडले. त्याबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या आदिवासींना चारणांनी जातिवाचक शिवीगाळ करून बेदम मारहाण केली. त्यात तीन जण गंभीर जखमी झाले. सांगवी (ता. शिरपूर) येथील दंगल नियंत्रणासंदर्भात पोलिसांचे वर्तन आक्षेपार्ह असून, या दंगलीची 'सीबीआय'तर्फे चौकशी करावी, शिरपूर उपविभागाचे पोलिस उपअधीक्षक सचिन हिरे व सांगवी पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक जयेश खलाणे यांची बदली करावी, आदिवासी युवकांवरील गुन्हे मागे घ्यावेत, अशा मागण्या विविध आदिवासी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी (ता. १८) जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना निवेदन देऊन केल्या. दंगलीनंतर निर्दोष आदिवासी युवकांना लक्ष्य करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. त्यामुळे समाजात अस्वस्थता पसरली. पोलिस राजकीय दबावाखाली काम करीत असल्याची भावना वाढीस लागली आहे. त्यामुळे पोलिस उपअधीक्षक हिरे व सहाय्यक निरीक्षक खलाणे यांची तातडीने बदली करावी, दंगलीची सीबीआय चौकशी करावी, खरे गुन्हेगार हुडकून काढावेत आणि युवकांवरील गुन्हे मागे घ्यावेत, अशा मागण्या भिल समाज विकास मंचाचे संस्थापक अध्यक्ष दीपक अहिरे, जिल्हा सचिव अशोक सोनवणे, बिरसा फायटर्सचे नाशिक विभागीय अध्यक्ष विलास पावरा, जिल्हाध्यक्ष वसंत पावरा, तालुकाध्यक्ष ईश्वर मोरे यांनी केल्या.

जिल्ह्यातील चंदन तस्करीची साखळी कोणत्या 'मुरुगन'पर्यंत

धुळे जिल्ह्यातील भोरखेडा येथील चंदन उत्पादक शेतकऱ्याच्या शेतातून चक्क ६५ चंदनाच्या झाडांची तष्करी झाल्याची घटना घडली आहे. पिंपळनेरच्या वन विभागाच्या हद्दीत चंदन चोरीची घटना घडली आहे. उभी चंदनाचे झाडे कापून चंदन तष्करी करणारा हा पुष्पा कोण ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सध्या जिल्ह्यात चंदन चोरीच्या घटना घडत आहे. काही किरकोळ व्यवसायाचे निमित्त करून दिवसा हे लोक फिरतात आणि चंदन झाडांची रेकी करतात. रात्रीत ही झाडे गायब झालेली असतात. चंदनाच्या झाडाचे एक निश्चित वय पूर्ण व्हावे लागते, तरच त्याचे लाकूड आणि त्यातील अर्क उपयुक्त ठरतो. अनेकदा झाड तोडले जाते. ते लहान असल्याचे लक्षात आल्यानंतर ते तसेच सोडून चोरटे निघून जातात. आपल्याकडे बांधावर उगवणाऱ्या सामान्य चंदनाचे पाच-सात फुटांचे झाड तोडल्यानंतर त्यातील फारसे मूल्य नसलेला ९० टक्के भाग तेथेच काढून टाकला जातो आणि महागडा विकला जाणारा त्यातील गाभा घेतला जातो. चंदनाच्या झाडाची खरेदी करायला काही लोक आले, तर त्याच दिवशी व्यवहार करा, अन्यथा रात्रीत ते झाड चोरीला जाते, असा अनुभव अनेकांनी घेतला आहे. त्याची प्रचंड धास्ती आजही कायम आहे. गावागावांत फिरणाऱ्या अशा छोट्या चोरट्यांचा 'पुष्पा' कोण आणि ही साखळी कोणत्या 'मुरुगन'पर्यंत आहे, याची माहिती चर्चेत असते. ती पोलिस दप्तरी येणार का,हाच मुख्य मुद्दा आहे. चंदन तस्करी करणारे दिवसा शेतात, जंगलात फिरून चंदनाची झाडे हेरून ठेवतात. त्या ठिकाणी कोणी नसेल तर गिरमीटाच्या सहाय्याने झाडाच्या बुंद्याला जमिनीपासून काही उंचीवर छिद्र पाडून ते चोर गाभा भरलेला आहे की नाही याची खात्री करतात. हा संपुर्ण प्रकार रात्रीच्या काळोखात केल्या जातो. असे देखील घडलेल्या घटनांवरून दिसत आहे. सध्या पुष्पा चित्रपटातील डायलॉग गाजताहेत. त्यात रक्त चंदनाच्या तस्करीची मिळणारे करोडो रुपयांचे गारुड सध्या अनेकांवर आहे. नेमकी हीच बाब हेरुन या घटना घडत नसतील अशी देखील चर्चा होताना दिसत आहेत.

शोध बातमी
पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.७०५७०१११२६

बंगलाही सुटला नाही

धुळे शहरातील वनसंरक्षकांचे निवासस्थान व सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाच्या आवारातून चोरट्यांनी चंदनाचे झाड लंपास केले. बंगल्याच्या आवारापर्यंत चंदन तस्करांची मजल गेली. इथे वनसंरक्षकांचे निवासस्थान व सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय सुरक्षित नसेल, तर चंदनाची शेती करण्याचे धाडस कोण करेल?

कशी होते चंदन तस्करी?

चंदन तस्करी करणारे दिवसा शेतात, जंगलात फिरुन चंदनाची झाडे हेरुन ठेवतात. आजूबाजूला पाहणारे कोणी नसेल तर गिरमीटाच्या साहाय्याने झाडाच्या बुंध्याला जमिनीपासून काही उंचीवर छिद्र पाडून हे चोर गाभा भरलेला आहे की नाही याची खात्री करून घेतात. काही वेळा शेतकऱ्याला किरकोळ किंमत देऊन झाड विकत घेतात किंवा मग रात्रीच्या वेळी झाड चोरुन नेले जाते. चोरी करणारे हे शिवाराची माहिती असणारे असतात. पोलिसांकडून किंवा वन विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याने चंदनचोरांचे हे जाळे गावोगावी पसरलेले आहे.

महाराष्ट्राचा पहिला उद्योगरत्न पुरस्कार रतन टाटा यांना प्रदान

मुंबई । प्रतिनिधी

उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा पहिला 'उद्योगरत्न' पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक, पद्मविभूषण रतन टाटा यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज प्रदान करण्यात आला. टाटा यांना त्यांच्या कुलाबा येथील निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांनी २५ लाख रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व मानपत्र या स्वरुपात पुरस्कार प्रदान केला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, टाटा सन्सचे चेअरमन तथा महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी उपस्थित होते. तत्पूर्वी रतन टाटा यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी टाटा यांच्यासमवेत चंद्रशेखरन आदींशी उद्योग आणि राज्यातील विकास प्रकल्पांविषयी चर्चा केली.

टेबलावरचे युद्ध

भारत आणि चीन यांची कोअर कमांडर पातळीवरची बोलणी फिसकटली आहेत. चीनचे सत्ताधीश शी जिनपिंग हे पुढच्या महिन्यात जी-२० परिषदेसाठी भारतात येण्याची शक्यता आहे. ते येण्याआधी पूर्व लडाखमधील दोघांची लष्करी ठाणी, तेथे चालणारी गस्त, काही ठिकाणाहून चीनने माघार घेणे, सीमावर्ती भूभागाचे काही पट्टे सामंजस्याने निर्लष्करी करणे.. आदी मुद्द्यांवर काहीतरी तडजोड किंवा एकमत होईल, अशी अपेक्षा होती. ती पुरी झालेली नाही. चीनच्या दबावाला भारताने बिलकुल भीक घातलेली नाही; हा या बोलणी फिसकटण्याचा अर्थ आहे. तो भारताच्या नव्या, ठाम भूमिकेला साजेसा आहे. भारताने १९९६ मध्ये चीनशी केलेल्या करारात दोन्ही बाजूंनी काही झाले तरी गोळीबार होऊ नये, हे कलम मान्य केले होते. त्याचा तोटा असा झाला की, चीनचे लष्कर म्हणजे 'पीपल्स लिबरेशन आर्मी'च्या तुकड्या संधी साधून सीमावर्ती भागात कमी-अधिक घुसखोरी करीत राहिल्या.

भारतीय लष्कराचे हात मात्र कराराने बांधलेले राहिले. आत्ताही चीन जवळपास गेली तीन वर्षे सीमाभागात घुसखोरी, कटकटी करीत आहे. चीनशी असणारा सीमावाद मोठा व गुंतागुंतीचा आहे. मात्र, सध्या एप्रिल २०२० च्या आधीची स्थिती सीमेवर आणण्यास चीन तयार होणार का, हा खरा कळीचा मुद्दा आहे. चीनने ही पूर्वस्थिती मान्य केली तर चिनी लष्कराला बरेच मागे जावे लागेल. तसे या चर्चेत झालेले नाही. दोन्ही देशांनी संयुक्त निवेदन जारी केले आणि चर्चा पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिली, हाच त्यातला एकमेव आशेचा किरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग हे परस्परांना भेटताना अगदीच शत्रुराष्ट्रांचे प्रमुख एकमेकांशी गप्पा मारत आहेत, असे दिसू नये, इतक्याच माफक उद्देशाने या संयुक्त निवेदनाची शब्दरचना केलेली दिसते.

भारताने चीनसमोर पडती बाजू घ्यावी, अशी स्थिती सध्या नाही. जागतिक पातळीवर चीनची आर्थिक कोंडी होण्याची शक्यता आहे. चीनमध्ये देशांतर्गत मागणीला ओहोटी लागली आहे. निर्यात घसरत आहे. जगातील विकसित देश या 'जगाच्या कारखान्या'ला पर्याय शोधत आहेत. अनेक प्रकल्पांबाबत तो शोध भारताशी येऊन थांबतो आहे. जिनपिंग यांचा तैवानवरचा दबाव वाढत असताना आणि चीन तेथे बळाचा वापर करणार की काय, अशी शंका असताना भारताच्या तीनही सैन्यदलांच्या माजी प्रमुखांनी तैवान दौरा केला आहे. तेथे एका परिषदेचे निमित्त असले तरी ही भेट हा चीनला एक इशारा आहे. त्याचप्रमाणे, चीनबाबत आमची भूमिका स्पष्ट आहे; या संदेशही या भेटीतून युरोप, जपान आणि अमेरिकेला देण्यात आला आहे.

तैवानमध्ये निवृत्त सैन्यदल प्रमुखांना पाठवून भारताने जी आक्रमकता दाखविली; तशीच आक्रमकता कोअर कमांडर पातळीवरील दोन दिवस चाललेल्या बोलण्यांमध्ये दाखवायला हवी होती, असे काही संरक्षण तज्ज्ञांचे मत होते. दोन्ही बाजूंनी सध्याची संरक्षण सिद्धता वाढवू नये आणि आहे तीच स्थिती कायम ठेवावी, यावर एकमत झाले आहे. भारताने हे मान्य न करता आपल्या बाजूने संरक्षण सिद्धता वाढविण्याचा पर्याय निदान तत्त्वत: तरी मोकळा ठेवायला हवा होता, असा एक दृष्टिकोन आहे. मात्र, भारताशी होणारी चर्चा सोपी नाही आणि भारत आता कोणत्याही दबावाखाली येणार नाही, इतकी तरी खूणगाठ चीनने बांधली असणार. ही चर्चा सुरू होण्यापूर्वी भारताच्या संरक्षण सिद्धतेबाबत जी माहिती देण्यात आली; ती महत्त्वाची होती. श्रीनगरला आता मिग-२१ च्या जागी मिग-२९ विमाने तैनात असतील. याशिवाय, उत्तर सीमेवरचे अत्याधुनिक ड्रोन वेळ पडली तर केवळ टेहळणी करून थांबणार नाहीत. ते प्रसंगी क्षेपणास्त्रांचाही मारा करू शकतील. ही सगळी तयारी स्वाभाविकच चीनसाठी आहे. करोनोत्तर काळात जागतिक राजकारण झपाट्याने बदलत आहे. त्यात अनेक ठिकाणांहून चीनविरोधी स्वर निघत आहेत. चीनची देशांतर्गत आर्थिक स्थिती तर उत्तम नाहीच; पण शी यांचीही पकड कितपत भक्कम राहिली आहे, हे कुणीही सांगू शकत नाही. अशावेळी, दबाव येण्याऐवजी चीनवर दबाव टाकून सीमावादावरील चर्चेत बचावात्मक भूमिकेत जायला आपण भाग पाडायला हवे. त्यासाठी भारताच्या एकूणच चीनधोरणात आणखी आक्रमकता येण्याची आवश्यकता आहे. आत्ताची चर्चा फसणे, ही काळजीची गोष्ट नसून समाधानाची बाब आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांच्या भेटी होऊन गेल्यावर भारत आणि चीन पुन्हा चर्चेच्या टेबलावर येतील; तेव्हाही असेच ठाम राहावे लागेल. भूतकाळात झाले ते झाले. तसे पुन्हा होता कामा नये.

'आत्मनिर्भर भारत' च्या माध्यमातून जागतिक नेतृत्व प्राप्त करण्याचा मार्ग

आज अचानकपणे भारताची आश्चर्यकारक वैज्ञानिक प्रतिभा आणि क्षमतेमुळे जग स्तंभित झाले आहे, जी बराच काळ सुप्तावस्थेत आणि दुर्लक्षित होती. मात्र पोषक वातावरण आणि पाठबळ देणाऱ्या नेतृत्वाची तिला प्रतीक्षा होती. इतिहासामधील अगदी त्याच क्षणी नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान झाले आणि मग बाकी सर्व इतिहास समोर आहे. जगाला पहिली डीएनए कोविड लसीची भेट देण्यापासून ते चांद्रयान मोहिमेच्या माध्यमातून चंद्राच्या पृष्ठभागावर पाणी असल्याची पुष्टी करणारे पुरावे देण्यापर्यंत मोदींच्या भारताने ठोस दाखल्यांच्या माध्यमातून आपली छाप निर्माण केली आहे, ज्यामुळे एक देश म्हणून भारताची सार्वत्रिक ओळख निर्माण झाली आहे.

गेल्या ९ वर्षांत भारताने विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांच्याशी संबंधित विक्रमी संख्येने राष्ट्रीय धोरणे आणली आहेत. या महत्त्वाच्या धोरणांमध्ये भारतीय अंतराळ धोरण (२०२३), राष्ट्रीय भूअवकाश धोरण(२०२२), राष्ट्रीय शिक्षण धोरण (एऩईपी) (२०२०), राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स धोरण (एनपीई) (२०१९), शालेय शिक्षणात राष्ट्रीय माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान धोरण (२०१९), विद्यार्थी आणि अध्यापकांसाठी राष्ट्रीय नवोन्मेष आणि स्टार्ट अप धोरण(२०१९), राष्ट्रीय आरोग्य धोरण (२०१७), बौद्धिक संपदा अधिकार धोरण(२०१६) इ. चा समावेश आहे. त्याचप्रकारे सरकारने राष्ट्रीय क्वांटम मिशन (२०२३), एक आरोग्य मिशन (२०२३), राष्ट्रीय खोल महासागर मिशन (२०२१) इ. सुद्धा सुरू केली. एसईआरबीच्या गेल्या १० वर्षातील सरासरीच्या आधारावरील आकडेवारीनुसार संशोधनासाठी असलेल्या एकूण निधींपैकी आयआयएससी, आयआयटी, आयआयएसईआर इ. राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांना सुमारे ६५% निधी दिला जातो आणि केवळ ११% निधी राज्यांमधील विद्यापीठांना दिला जातो. जिथे संशोधकांची संख्या आयआयटींपेक्षा खूपच जास्त आहे. याचे कारण म्हणजे संशोधनासाठी निधी पुरवठ्याची ही पद्धत स्पर्धात्मक अनुदान आधारित आहे.

त्याचप्रकारे बहुतेक राज्य विद्यापीठांमध्ये संशोधनाच्या पायाभूत सुविधा राष्ट्रीय शैक्षणिक संस्था आणि संशोधन आणि विकास प्रयोगशाळांच्या तुलनेत खूपच कमी दर्जाच्या असतात. आपल्या विद्यापीठांमध्ये शिक्षणसंस्था आणि उद्योगांची भागीदारी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य बऱ्याच अंशी अपुरी राहिलेली आहे. सध्याच्या संशोधन आणि विकास परिसंस्थेमधील आव्हानांची केवळ हाताळणीच करू शकणार नाही, तर देशाला दीर्घकालीन संशोधन आणि विकासाचा दृष्टिकोन प्रदान करेल. भारताला पुढील पाच वर्षात जागतिक संशोधन आणि विकास क्षेत्रातील नेतृत्व करणारा देश बनवेल, अशाप्रकारच्या खऱ्या अर्थाने परिवर्तनकारक अनुसंधान राष्ट्रीय संशोधन मंच (एनआरएफ) स्थापन करण्याचा दृष्टिकोन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा होता.

अनुसंधान एएनआरएफ (-छठऋ) गणितीय विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, पर्यावरण आणि पृथ्वी विज्ञान, आरोग्य आणि कृषी यासह नैसर्गिक विज्ञान क्षेत्रातील संशोधन, नवकल्पना आणि उद्योजकतेसाठी उच्चस्तरीय धोरणात्मक दिशा प्रदान करेल. ते मानवतेच्या शास्त्रीय आणि तंत्रज्ञानविषयक बाजूंना आणि सामाजिक विज्ञानाला अशाप्रकारच्या संशोधनासाठी आणि त्यांच्याशी संबंधित प्रकरणांना आवश्यक असलेली चालना, देखरेख आणि पाठबळ देण्यासाठी प्रोत्साहन देखील देईल. एएनआरएफ भारतभरातील विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन संस्था आणि संशोधन आणि विकास प्रयोगशाळांमध्ये संशोधन आणि विकास रुजवेल, वृद्धी करेल आणि प्रोत्साहन देईल आणि संशोधन आणि नवोन्मेषाची संस्कृती निर्माण करेल.

भारत सरकारचा विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग (डीएसटी) एएनआरएफचा प्रशासकीय विभाग असेल. नामवंत संशोधक आणि विविध विषयांतील व्यावसायिकांचा समावेश असलेल्या शासन मंडळाकडून तो चालवला जाईल, ज्याचे पंतप्रधान हे पदसिद्ध अध्यक्ष आणि केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री आणि केंद्रीय शिक्षणमंत्री पदसिद्ध उपाध्यक्ष असतील. भारत सरकारच्या प्रधान वैज्ञानिक सल्लागारांच्या नेतृत्वाखालील कार्यकारी परिषदेकडून एनआरएफच्या कामकाजाची हाताळणी केली जाईल. एएनआरएफ उद्योग, शिक्षणसंस्था आणि सरकारी विभाग आणि संशोधन संस्था यांच्यात सहकार्य निर्माण करेल आणि वैज्ञानिक आणि संबंधित मंत्रालयांव्यतिरिक्त उद्योग आणि राज्य सरकारे यांचा सहभाग आणि योगदानासाठी एक इंटरफेस यंत्रणा निर्माण करेल. धोरणाची चौकट निर्माण करण्यावर आणि संशोधन आणि विकासावर उद्योगांकडून वाढीव खर्चाला आणि सहकार्याला प्रोत्साहन देणाऱ्या नियामक प्रक्रिया निर्माण करण्यावर तो भर देईल.

२०२३ ते २०२८ या पाच वर्षांच्या काळात सुमारे ५०.००० कोटी रुपयांच्या खर्चाने एएनआरएफची स्थापना करण्यात येईल. एएनआरएफच्या ५० हजार कोटी रुपयांच्या निधीचे तीन घटक असतील. ४००० कोटी रुपयांचा एसईआरबी निधी, १०,००० कोटी रुपयांचा एएनआरएफ निधी, ज्यापैकी १० टक्के निधी (१००० कोटी रुपये) नवोन्मेष निधीसाठी राखून ठेवला जाईल. नवोन्मेष निधीचा वापर खासगी क्षेत्रासोबतच्या भागीदारीतून संशोधन आणि विकासासाठी वापरला जाईल आणि ३६,००० कोटी रुपयांच्या निधीचे योगदान उद्योग, परोपकारी संघटना, आंतरराष्ट्रीय संस्था इ. कडून दिले जाईल. केंद्र सरकार एसईआरबीला वार्षिक ८०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देत आहे, त्यामध्ये खासगी क्षेत्राचे योगदान अत्यल्प किंवा नगण्य असते. प्रस्तावित एएनआरएफमध्ये सरकारच्या योगदानात ८०० कोटी रुपयांवरून वार्षिक २८०० कोटी रुपयांपर्यंत (३.५ पट) वाढ करण्याचे प्रस्तावित आहे. प्रस्तावित एएनआरएफमध्ये खासगी क्षेत्राचे योगदान पाच वर्षांसाठी ३६,००० कोटी रुपये केले जात आहे (वार्षिक ७२०० कोटी रुपये).

जागतिक संशोधन आणि विकासात भारताचे नेतृत्व साध्य करण्यासाठी आणि आगामी वर्षांत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी, एएनआरएफ भारताच्या सर्वात जास्त परिवर्तनकारक पावलांपैकी एक म्हणून सिद्ध होईल.

- डॉ. जितेंद्र सिंह: राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय

मोबाइलच्या दुनियेत ग्रंथालयांची दुरवस्था

आज आपण ज्या व्यक्तींना विषयांचे तज्ज्ञ म्हणतो, ते त्यांनी विविध ग्रंथांचा अभ्यास करून मिळविलेल्या ज्ञानामुळे. हे ग्रंथ मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे ग्रंथालय होय. मात्र आजच्या युगात मोबाइलमुळे ग्रंथालयांची दुरवस्था होताना दिसत आहे. काही विचारवंत आपल्या परिसरातील ग्रंथालयात जाऊन, विविध ग्रंथांचे वाचन करून आपले विचार समाजापुढे मांडत असतात. यातून त्यांना समाज प्रबोधन करायचे असते. आजही जे वादविवाद होत असतात, त्याचे एकमेव कारण म्हणजे अपुरे वाचन होय. जे अभ्यासक असतात ते एखाद्या विषयावर व्याख्यान देत असताना जी उदाहरणे देतात त्याचे संदर्भ सुद्धा देत असतात. यासाठी संदर्भ ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे. त्याचप्रमाणे त्याची पडताळणी सुद्धा करणे आवश्यक असते. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे वादविवाद होत नाहीत. अधिक सलोख्याचे संबंध निर्माण होतात. त्यात काही विचारवंत विविध वर्तमानपत्रे व नियतकालिकांमधून आपले विचार लिहीत असतात. त्यामुळे त्यांना लोक विचारवंत, लेखक म्हणतात. विचारवंत किंवा त्या विषयाचे तज्ज्ञ म्हणून घेण्यासाठी तसे त्या व्यक्तीला खूप मेहनत घ्यावी लागते. त्यात जी व्यक्ती प्रामाणिकपणे मेहनत घेते ती यशस्वी होते.

सन २००० पर्यंत मोबाइल खूप कमी लोकांकडे होते. त्यांनतर लोकांच्या असुरक्षिततेबाबत अनेक प्रकार घडत असल्यामुळे मोबाइल सुद्धा मूलभूत गरजेच्या पंक्तीत बसला. अनेक लोकांना



अपघातात मोबाइल वरदान ठरला. असे म्हणता म्हणता मोबाइलने सर्वच चित्र बदलून टाकले. मोबाइलच्या पायी नागरिक टीव्हीसुद्धा पाहत नाहीत. मग सांगा पुस्तके कशी वाचणार. आता तर प्रत्येक नागरिकांच्या हातात मोबाइल पाहायला मिळतो. सध्या नागरिकसुद्धा तासनतास मोबाइलवर वेळ घालविताना दिसतात. इतकेच नव्हे; तर मैदानात खेळायला गेलेली मुले मैदानाच्या कडेला असलेल्या झाडाखाली बसून डोळे फाडून मोबाइलमध्ये रमलेली दिसतात.

मग सांगा मुले ग्रंथालयात जाणार कशी? आता सांगा मोबाइलवर निर्बंध जरी घातले तरी त्याची अंमलबजावणी कशी होणार? किंवा कोण करणार, याचे उत्तर अनुत्तरित राहते. तेव्हा मोबाइल धारकांनी याचा गांभीर्याने विचार करून आपल्या भविष्याचा विचार करता कामापुरता मोबाइलचा वापर करावा. महत्त्वाची गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांनी उद्या म्हणण्यापेक्षा आजपासून शाळा, अभ्यास व इतर कामे करीत असताना आपण आपल्या शाळेच्या किंवा आपण राहात असलेल्या परिसरातील ग्रंथालयात गेले पाहिजे. प्रथम एखादे पुस्तक वाचायला आवडणार नाही. त्यासाठी ग्रंथालयात गेल्यावर ग्रंथालयाची इमारत पाहावी. त्यानंतर इमारतीच्या कपाटामध्ये कशाप्रकारे पुस्तकांची मांडणी केलेली आहे, त्याचे निरीक्षण करावे. त्यात महत्त्वाची बाब म्हणजे, अभ्यासाला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे निरीक्षण करावे. काही दुर्मीळ ग्रंथ असतील ते पाहावेत. तसेच भिंतीवर असणाऱ्या प्रतिमांकडे पाहावे. म्हणजे आपोआप आपल्या मनात पुस्तक वाचनाची आवड निर्माण होईल.

मुलांनी स्वत:च्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन वाढवले पाहिजे. वाचनामुळे आपल्या जीवनाला गती मिळते. त्यासाठी मोबाइलचा कामापुरता वापर करावा. वेळ वाया न घालविता अधिकाधिक वेळ ग्रंथालयात घालवावा. कोण काय करतो, यापेक्षा आपण कोणत्या लेखकाची पुस्तके वाचली किंवा पाहिली हे महत्त्वाचे. मुलांना वाचनच सुसंस्कृत बनवू शकते. ग्रंथालयांचा विचार करता बऱ्याच शाळांच्या इमारती जुन्या झालेल्या आहेत. त्यामुळे पावसाळ्यात गळती मोठ्या प्रमाणात होते. याचा परिणाम पुस्तके पावसाच्या पाण्यात भिजून जातात.

काही ठिकाणी ग्रंथालयात गेल्यावर ज्या ठिकाणी पाऊस लागल्यावर पाणी गळते, त्याठिकाणी बादली लावलेली दिसते. त्यात अनेक ग्रंथ भिजून चिंब झाल्याने एका कोपऱ्यात पांढऱ्या कपड्यामध्ये बांधून ठेवलेले दिसतात. तर काही ठिकाणी लाखो रुपये खर्च करून इमारत बांधून कित्येक वर्षे पुस्तकांची वाट इमारत बघत असताना दिसते. तर काही ठिकाणी साफसफाई करायला स्टाफ नसल्यामुळे ग्रंथालयात धुळीचे साम्राज्य असल्यामुळे विद्यार्थी तिकडे जाणे दुर्लक्ष करतात. त्यात कपाटामध्ये असलेली पुस्तकेसुद्धा जुनी झाल्याने पुस्तकांमधील आतील काही पाने गहाळ झालेली दिसतात. तेव्हा विद्यार्थ्यांची एकच अपेक्षा असते ती म्हणजे पुस्तके नवीन असावीत. त्यात ग्रंथालयाची जागा स्वच्छ असावी.

मी प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना ग्रंथालयात जाऊन जे वाचायला मिळत असे, त्याचे मन लावून वाचन केले. केवळ वाचन अभ्यासापुरते मर्यादित ठेवू नये. वाचनामध्ये सातत्य असावे. वाचनच प्रत्येकाच्या प्रवासात नवीन दिशा देत असते. त्यासाठी मोबाइलच्या दुनियेत ग्रंथालयांची जी दुरवस्था झालेली आहे, त्यासाठी शासनस्तरावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. शासनमान्य जी ग्रंथालये आहेत, त्यांची स्वतंत्र इमारत आहे का? त्या इमारतीची डागडुजी दरवर्षी केली जाते का? पुस्तकांची वर्गवारी केली जाते का? विद्यार्थी नियमित येतात का? स्थानिक दैनिकं वेळेवर येतात का?

त्याचप्रमाणे लोकांचा प्रतिसाद कसा आहे? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला द्यावी लागतील. तसेच विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचे महत्त्व पटवून द्यावे लागेल. जेणेकरून सध्याची पिढी मोबाइलपासून चार हात दूर राहील आणि तो वेळ ग्रंथालयात घालवतील. म्हणजे ग्रंथालयांची दुरवस्था होणार नाही. त्यासाठी शासन स्तरावर मोबाइलचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना सांगून त्यांना मोबाइलपासून काही काळ दूर ठेवून ग्रंथालयात बसावयास सांगावे लागेल. म्हणजे आपोआप मोबाइलवर निर्बंध येऊन ग्रंथालयांची दुरवस्था दूर होण्याला मदत होईल.

- रवींद्र तांबे

शब्दकोडे-१५५

आडवे शब्द : १. जिंकणारा ३. पालिकेतील लोकप्रतिनिधी ७. प्रचंड, लईभारी! १०. तरतूद ११. मऊ १३. दारू (हिंदी) १४. खोटेपणा, लुच्चेगिरी १६. नीच, दुष्ट १९. 'कशाला उगाच' असा त्रास २२. वल्लारी, वेल २५. नगाऱ्याचा आवाज २८. शीख धर्माचे संस्थापक ३०. अर्थसंकल्प ३३. चंद्र ३५. मेंढपाळ ३६. लोखंड घासण्याचे हत्यार ३७. लाटण्याचा जोडीदार ३९. अनामिके शेजारचे बोट ४१. याच्या घरट्यात कोकिळा अंडी घालते अशी समजूत आहे ४३. पादत्राण ४४. तरतरीत ४६. लंबकर्ण पण गाढव नव्हे! ४७. जुन्या जमान्यीतल गाण्याची रेकॉर्ड ४८. पंख ४९. पुन्हा ५०. दुर्लक्ष, हेळसांड ५१. पल्याड ५२. हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे 'सरदार' ५३. जाणता राजा ५५. चालू दिवस ५७. धूळधाण, नासाडी ५८. ज्वाळा, दाह ५९. वरपांगी, दिखाऊ ६१. माजलेला ६३. रूचीहीन, पचपचीत ६४. खळबळजनक ६६. कोवळ्या दुधाचा पदार्थ ६८. बासरी ७०. हिंदीत वचन ७१. दरवाजा ७२. इंद्रिय- उदा. हात, पाय ७३. वाळवी ७४. टोळीचा प्रमुख ७७. घोड्याचे अंग घासणे ७८. आत्या ७९. अवश्य!

उभे शब्द : १. भव्य, प्रचंड, खूप २. घाई, त्वरा ३. नूतन ४. सुगंधी फुलांची साजशृंगार वाढवणारी माळ ५. जंगल ६. हात ८. रीत, पद्धत ९. मध्यस्थ, अडत्या १२. अभिप्राय १५. पोते १७. 'एक ना -- भाराभर चिंध्या!' १८. बंगालच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री २०. पालकांची छत्रछाया असलेला २१. दुबळा, गरीब २३. विरह, फारकत २४. पणजोबांचे वडील २६. वाघाची ललकारी २७. रोटी-कपड्याबरोबर हे देखील हवेच २९. पंकज ३०. दृष्टीहीन ३१. विश्व, दुनिया ३२. ताज्या कैरीची फोड अशी लागते ३४. नासलेला ३७. बैलाचा एकमेव सण ३८. मर्यादा ४०. किल्लेदार ४२. कोळशाचे दुकान ४३. नेम, व्रत ४४. तापविणारा सूर्य ४५. नातेवाईक ४६. प्रसिद्ध पुणेरी पेठ ४८. मागील अंगणाचा दरवाजा ५०. मरेपर्यंत ५१. गवताचे रुंद पान ५२. स्वीय सचिव ५४. उत्तराधिकारी ५५. फोडणीचे वरण ५६. एक मिश्र धातू ५८. आजूबाजूला ६०. रसाळ ६२. पृथ्वीभोवतीचे हवेचे वेष्टन ६५. बाई ६६. 'खाई त्याला ----' ६७. सिंह ६९. नियमित यात्रेला जाणारा ७०. गाईचे बछडे ७३. राहुल देशपांडे याने पुनरूज्जिवित केलेले संगीत नाटक- '--- काळजात घुसली!' ७५. राणीची सेविका ७६. चौथा भाग



शब्दकोडे १५४ चे उत्तर

आडवे उत्तर
१.दुर्जन ४.सामदामदंडभेद १०.जवळजवळ ११.गट १२.सारा १३.डबर १५.काका १६.लगाम १७.गरम १९.माळकरी २०.सारंग २१.नवरस २४.सरा २५.याग २६.नरमगरम २८.अनाथाश्रम २९.बकबक ३१.नाद ३२.जगन्नाथ ३३.कली ३४.ताई ३५.साल ३६.भकास ३८.कानशील ४०.बादल ४२.राम ४३.कळप ४४.अवसान ४६.शाल ४७.डबल ४९.लवाद ५१.तरस ५३.चोर ५४.चाकर ५६.यान ५९.उपकार ६०.लवाजमा ६३.वतनवाडी ६६.मालदार ६७.लस ६९.महाकाय ७१.साहस ७२.महासागर ७३.चरखा ७४.वरवर

उभे उत्तर
१.दुपेड २.नजर ३.खळबळजनक ४.सावकारी ५.मळका ६.मजलदरमजल ७.डगमग ८.भेट ९.आराम हराम १२.सार १४.बजरंगबली २०.साया २१.नगद २२.वर २३.अनाथ २४.सश्रम कारावास २७.मनाई २८.अन्नान्नदशा ३०.बस्तान ३३.कलकलाट ३४.ताल ३५.सालोसाल ३७.सम ३८.कापडचोपड ३९.शीतल ४१.ललत ४४.अनाकलनीय ४५.नवा ४८.बरका ५०.दया ५२.रतन ५५.रवा ५७.नवरदेव ५८.ताडी ६१.जमादार ६२.माल ६४.वार्ताहर ६५.तलम ६८.सहा ६९.मग ७०.हार ७१.साव

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्या

शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांचे आवाहन

शिवसेना नाशिक पश्चिम विधानसभा शिवसेना पदाधिकारी बैठक संपन्न

पश्चिम नाशिक विधानसभा शाखा प्रमुख

तुषार केळकर, गोकुळ शिंदे, रितेश तेजाळे, राहुल पगारे, गौरव शिंदे, केशव मोरे, ऋषिकेश हिरे, नीरज पाटील, गिरीश गवळी, सुनील पाटील, निखील धुमाळ, रुपेश पाटील, स्वप्नील शेटे, निलेश सोनवणे, अविनाश गोसावी, सागर खाडे, सुमित बर्वे, गणेश पाटील, प्रतिक पगारे, संदीप भालेराव, अविनाश केदारे, सौरभ नागरे, संघम काळे, सुरज सोनवणे, प्रशांत घोगरे, दिनेश काळे, धवल डरांगे, ज्ञानेश्वर घुगे, दुर्गेश चौधरी, आदित्य माळी, शुभम काळे, प्रणय कामठे, रुपेश बागुल, विकास शिंदे, आकाश देशमुख, पप्पू साळवे, अशोक होळकर, सुधीर पाटील, योगेश वीर, वैभव लोखंडे, शंकर घायाळ, वैभव कांबळे, सतीश उशीर, रोहित सहाने, देविदास भामरे, शिवराज डुंबरे, छोटू मोरे, स्वप्नील सोनार, तन्मय हिवाळे, सचिन देशपांडे, भगवान जगताप, किशोर पतेजा, अमोल बराडे, हेमा छाजेड, प्रियांका पाटील, शुभम पाटील, दिपक धोंगडे, महेश श्रीवास्तव.

पश्चिम नाशिक विधानसभा विभाग प्रमुख

शरद चिखले, अतुल हंडोरे, विकी जाधव, दिपक नागरे, अमित मांडगे, राजेंद्र मोहिते, अविनाश पांगरे, नितीन अमृतकर, सागर बोरसे, निलेश हांडगे, अनिल आढाव, दत्तात्रय पाटील, रामदास धात्रक, राजेंद्र रणमाळे, शैलेश कार्ले, चेतन चुंबळे.

पश्चिम नाशिक विधानसभा उपविभाग प्रमुख

देवा जाधव, प्रशांत गवळी, सचिन कुवर, सुनील कापडणीस, सागर पवार, योगेश जाधव, दिपक कडाळे, प्रशांत घोडके, संजय गायकवाड, अनिल काळे, रोहित घुले, ईशाख शेख, किशोर देशमुख, कल्पेश नरखेडे, हर्शल वाघ, सागर खोसे, मानव निकम, निलेश खोडे, पराग सावकार, संदिप पाटील, ऋषिकेश पटोले, पंकज देवरे, चंद्रकांत आहेर, राकेश सोनवणे, मनोज अहिरे, विकास एखंडे, तकदीर कडवे.

नाशिक । प्रतिनिधी

शिवसेना नाशिक पश्चिम विधानसभा शिवसेना पदाधिकारी बैठक शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत काल वेदांत मंगल कार्यालय, लेखानगर, सिडको येथे संपन्न झाली.

या बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रविण तिदमे, उप जिल्हाप्रमुख सुदाम डेमसे, शामकुमार साबळे, शशिकांत कोठुळे, प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, महेश जोशी, अमोल जाधव, माजी नगरसेविका संगीता जाधव, हर्षदा गायकर, मंदाकिनी जाधव, अस्मिता देशमाने, युवासेना विस्तारक योगेश बेलदार, जिल्हा समन्वयक सुनील वाघ, विधानसभा प्रमुख दिपक मोले, रोशन शिंदे, विधानसभा समन्वयक बबलू सूर्यवंशी, प्रकाश पवार, उप महानगर प्रमुख योगेश पाटील, आदित्य सरनाईक, अरुण घुगे, कल्पेश कांडेकर, प्रकाश दोंदे, आनंद फरताळे, प्रमोद जाधव, सागर पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, युवासेना महानगर प्रमुख दिगंबर नाडे, जिल्हा चिटणीस आदित्य बोरस्ते, विद्यार्थी सेना महानगर प्रमुख शुभम पाटील, युवासेना समन्वयक प्रतिक तिवारी, नरेंद्र शेखावत, अमेय जाधव, श्रावण पवार, अमोल जाधव, आकाश पवार, सनी पगार, भिवानंद काळे, दिलीप अहिरे, सनी रोकडे, विशाल साळवे, योगेश वाणी, शंतनू सौंदानकर, सरला चव्हाण, कावेरी अत्रे, आरती गायखे, योगिता चौरे, नंदा खुरणे, शरदचंद्र नामपूरकर आदी शिवसैनिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांचा नाशिक पश्चिम विधानसभेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शिवसेना महानगर प्रमुख प्रविण तिदमे यांनी पश्चिम विधानसभेची राजकीय बलाबल, भोगोलिक परिस्थिती यासंदर्भात माहिती दिली. सिडको, सातपूर, औद्योगिक वसाहत, पाथर्डी फाटा, गोविंदनगर, लेखानगर, राणेनगर, स्टेट बँक असा हा औद्योगिक कामगार असलेला, नोकरदार वर्गाचा यात समावेश असल्याची माहिती दिली.

शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांनी पश्चिम नाशिक विधानसभेतील सिडकोमधील रहिवासी घरे फ्री होल्ड करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे प्रस्ताव देणार असून, सिडको, सातपूरमधील कामगारांसाठी अंबड किंवा सातपूर औद्योगिक वसाहतीत नवीन औद्योगिक प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे मागणी करणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेसाठी विविध योजना राबवत असून त्या कार्यकर्त्यांनी समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत या योजनांची माहिती पोहचवून पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी काम करावे असे आवाहन केले.

शिवसेना नाशिक पश्चिम विधानसभा बैठकीत निवड झालेल्या नाशिक पश्चिम मधील १६ विभाग प्रमुख, २७ उप विभाग प्रमुख, ५८ शाखा प्रमुख पदाधिकाऱ्यांना त्याचे नियुक्ती पत्र, तसेच शिवसेनेच्या अंगीकृत संघटनाच्या नियुक्त पदाधिकाऱ्यांना त्याचे नियुक्ती पत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

शिवसेना नाशिक पश्चिम विधानसभा पदाधिकारी बैठकीत शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रविण तिदमे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभाग क्रमांक ८ मधील आनंदवल्ली, गंगापूररोड परिसरातील सामाजिक कार्यकर्ते कैलास जाधव, देवा जाधव, राहुल पगारे, गौरव शिंदे, गोकुळ शिंदे, आकाश जाधव, रवींद्र शिंदे, गणेश खैरे, रितेश तेजाळे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. तसेच झोपडपट्टी कामगार सेना महानगर प्रमुख सनी रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार व महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना दिव्यांग सेनेचे शहर प्रमुख शंतनू सौंदानकर यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिक शहरातील १०० हून अधिक दिव्यांगांनी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

तसेच प्रभाग क्रमांक २४ मधील विधानसभा समन्वयक सुलोचना मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली जुने सिडको परिसरातील महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला.

नाशिक प्रेस असोसिएशन कडून कॅमेरा पूजन करत छायाचित्रकार दिन साजरा

नाशिक । प्रतिनिधी

जागतिक छायाचित्रकार दिनानिमित्त नाशिक प्रेस फोटोग्राफर असोसिएशन तर्फे खासदार हेंमत गोडसे यांच्या हस्ते कॅमेरा पूजन करून छायाचित्रकार दिन साजरा केला . हुतात्मा स्मारक येथे नाशिक मधील प्रेस फोटोग्राफर उपस्थित होते. यावेळी खा गोडसे म्हणाले की, छायाचित्रकार हे कठोर मेहनत करून दररोज घडणाऱ्या घडामोडी कॅमेराच्या साह्याने टिपत असतात . छायाचित्रकारनीही समजाउपयोगी कामात सहभागी व्हावे . देशभरात अनेक घडामोडी घडत असतात, फोटोग्राफर आपल्या कलेच्या माध्यमातून या घटना कॅमेरात टिपतात.यावेळी ऊन वारा पाऊस याची कुठलीही तमा न बाळगता जनतेपर्यंत सातत्याने पोहचविण्याचे काम करतात.

या कार्यक्रमासाठी नाशिक प्रेस फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष निलेश तांबे , उपाध्यक्ष विवेक बोकील ,सरचिटणीस हेमंत घोरपडे ,यांच्यासह विविध दैनिकांतील छायाचित्रकार प्रशांत खरोटे, केशव मते , पंकज चांडोले, गणेश खिरकाडे, सतीश काळे , सतीश देवगिरे , अंबादास शिंदे , यतीश भानू , सोमनाथ कोकरे, अशोक गवळी. रवी तामनकर व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

जाहिर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री. भुपेश तुकाराम महाले, रा. २००, सत्य साईबाबा हौ.सो., साकी रोड, धुळे यांनी मौजे महिंदळे, ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. ८१/२ यापैकी प्लॉट नं. १३ चे एकुण क्षेत्र १७० चौ. मी. येणे प्रमाणे मिळकतीचे खरेदी करण्यास अनुषंगुन एच.डी.एफ.सी. बँक लि., शाखा देवपुर, धुळे यांचेकडे गृह कर्ज मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे मालमत्तेचे पुर्वी झालेले मालकी हस्तांतरणा बाबतचे १) मा. दुय्यम निबंधक सो., धुळे यांचे कार्यालयात दिनांक ३१/१२/१९८३ रोजी श्री. नरेश नानकराम डियालनी यांनी श्री. राजेंद्र चिमाजी गवळी यांच्या कडून रजि. खरेदी केलेले २) मा. दुय्यम निबंधक सो.,धुळे यांचे कार्यालयात दिनांक २१/०७/१९८८ रोजी श्री. पांडुरंग त्र्यंबक दुसाने यांनी श्री. नरेश नानकराम डियालनी यांच्या कडून रजि. खरेदी केलेले.

येणे प्रमाणे मुळ दस्त हे माझे पक्षकार घेत असलेल्या गृह कर्जा बाबत लिंक दस्ताऐवज असुन सदरचे दस्ताऐवज कोणासही मिळाले असल्यास त्याचा कोणीही गैरवापर करू नये तसेच सदरचे खरेदीखत किंवा त्याची मुळ एस. आर. पावती कोणत्याही संस्थेकडे, बॅन्केकडे किंवा इतर कोणाहीकडे तारण गहाण/नजर गहाण असल्यास किंवा त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोझा अथवा हितसंबंध असल्यास किंवा कोणालाही मिळून आल्यास किंवा कोणाचाही उजर आक्षेप असल्यास पुराव्याचे मुळ कागद पत्रांसह खालील पत्त्यावर ही नोटीस प्रकाशित झाल्याचे तारखेपासुन ७ (सात) दिवसांचे आत प्रत्यक्ष येऊन भेट घ्यावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकत / नोटीस आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच मुदतीनंतर कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सही पक्षकार
श्री. भुपेश तुकाराम महाले

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र, माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे :
दिनांक : १९/०८/२०२३

ॲड. विजय म. मोरे
ऑफिस - बी / १२,
भन्साली प्लॉझा, नगरपटटी, धुळे.

नाशिक परिमंडळात ग्राहक सेवा सप्ताहात ४२३ वीज जोडण्या

११ ऑगस्ट पर्यंत ग्राहकांनी तक्रारी दाखल करण्याचे आवाहन

नाशिक । प्रतिनिधी

महावितरणच्या ग्राहकांना अखंडित व तत्पर सेवा देण्याकरिता तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी महावितरणच्या नाशिक परिमंडलअंतर्गत ०२ ऑगस्ट पासून ग्राहक सेवा सप्ताह राबविण्यात आला असून याअंतर्गत नाशिक परिमंडळातील ३ हजार ६४ ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले असून तसेच पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी ४२३ वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या तत्पर सेवेबद्दल ग्राहकांनी समाधान व्यक्त केले असून, सदर मोहीम आता ११ ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र तथा महावितरणचे संचालक (संचलन) संजय ताकसांडे यांच्या निर्देशानुसार नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता दिपक कुमठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताह अंतर्गत तात्काळ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून त्यामध्ये नाशिक परिमंडळात अकृषक ग्राहकांना पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी तात्काळ ४२३ नवीन विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच नाशिक परिमंडळात वीज ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या ३ हजार ६४ तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात आले असून या तक्रारीमध्ये प्रलंबीत विद्युत जोडणी (पेड पेंडींग), कायमस्वरूपी तथा तात्पुरता खंडीत केलेला विद्युत पुरवठा पूर्ववत करणे, विद्युत देयकाच्या नावात बदल, विद्युत भार बदल, वर्ग बदलवारी, पत्ता बदल तसेच वीज बिल दुरुस्ती अशा तथा इतर तक्रारींचा समावेश होता. सदर मोहीम आता ११ ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आली असून ग्राहकांनी या कालावधीत आपल्या तक्रारी नजीकच्या महावितरण कार्यालयात दाखल करून निराकरण करून घ्यावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

मोदी सरकारच्या विश्वकर्मा योजनेमुळे वंचित कारागीर, बलुतेदारांचा होणार फायदा

नाशिक महानगर भाजप अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी केले सरकारचे अभिनंदन

नाशिक । प्रतिनिधी

मोदी सरकारच्या विश्वकर्मा योजनेमुळे विकासापासून वंचित राहिलेल्या कारागिरांना, गावगाड्यातील बलुतेदारांना मोठा फायदा होणार आहे. ही योजना जाहीर करून मोदी सरकारने 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' ही घोषणा प्रत्यक्षात आणली आहे. असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नाशिक महानगर भाजप अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी केले आहे. या योजनेबद्दल प्रशांत जाधव यांनी मोदी सरकारचे अभिनंदन केले आहे.

प्रशांत जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त 'पंतप्रधान विश्वकर्मा योजना' सुरू करण्याची घोषणा केली. केंद्रीय मंत्रिमंडळाने १६ ऑगस्ट रोजी १३ हजार कोटी खर्चाच्या या योजनेला मंजुरी दिली. समाजातील वंचित स्तरांमध्ये मजुरी आणि कारागिरी करणाऱ्या ३० लाख कारागिरांना या योजनेचा लाभ मिळणार असून या योजनेत १८ व्यवसायांचा समावेश करण्यात आला आहे. कारागिरांना व शिल्पकारांना विश्वकर्मा प्रमाणपत्र तसेच ओळखपत्र देण्यात येईल. साधनांच्या मदतीने काम करणारे हस्त-कलाकार आणि कारागिरांची गुरु-शिष्य परंपरा, त्यांच्या कुटुंबाची पारंपरिक कौशल्य जोपासणे आणि त्याला बळकटी देणे, हेही या योजनेचे उद्दिष्ट आहे.

या योजनेत कारागिरांना, शिल्पकारांना प्रथम टप्प्यात एक लाख रूपये, द्वितीय टप्प्यात दोन लाख रूपये फक्त ५ टक्के व्याजदराने उपलब्ध करण्यात येणार आहेत. कारागिरांना त्यांच्या व्यवसायाच्या दृष्टीने आवश्यक साहित्य, तांत्रिक, आधुनिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी प्रशिक्षण, डिजिटल व्यवहारासाठी तांत्रिक साहाय्य या योजनेद्वारे केले जाणार आहे. सुतार, नाव बांधणारे कारागीर, औजार बनवणारे कारागीर आदींना या योजनेचा लाभ मिळणार आहे, असेही प्रशांत जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

ॲड.शशिकांत आर. पाटील, धुळे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. मुख्य न्यादंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
दि. कि. अर्ज नं. ७६३/२०२३

सुरेश मुरलीधर पाटील उ.व.-७० वर्ष, कामधंदा-सेवानिवृत्त रा.प्लॉट नंद.१६, गोंदुर रोड, इद्रप्रस्थ कॉलनी, वलवाडी ता.जि. धुळे ....**अर्जदार**

विरुध्द

ग्रामसेवक, सो.कापडणे, ता.जि.धुळे ....**सामनेवाला**

अर्जदाराची भाची नामे राजश्री मधुकर पाटील, जन्म दि.२६/१०/१९९२

ज्याआर्थी अर्जदार याने धुळे येथील मे.ज्युडी. मॅजि. वर्ग-१ सो. कोर्ट नं. यांचे न्यायालयात फौ.कि.अर्ज नं.७६३/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) अन्वये त्याची भाची नामे राजश्री मधुकर पाटील हीच्या जन्म दि. २६/१०/१९९२ रोजीच्या जन्माची नोंद होणेबाबत सामनेवाला याना आदेश होणेसाठी धुळे येथील मे.न्यायालयात अर्जदार याने सदरच्या अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ.दि.३०/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.न्यायदंडाधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं.०८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी ते.कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे.न्यायालयाचे शिक्यानिशी, सही व शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

ठिकाण - धुळे
दिनांक - १९/०८/२०२३

शिक्का

कामगिरी कारकुन
कोर्ट नं, धुळे

सहायक अधीक्षक
न्यायालय धुळे

औद्योगिक वसाहतीतील समस्या सोडविण्यासाठी समावेशक समन्वय समिती गठीत करावी

पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांचे आवाहन

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकच्या औद्योगिक वसाहती बरोबरच नागरी वसाहती समस्या मुक्त करण्यासाठी महापालिका एमआयडीसी उद्योजक व पोलीस अशी सर्व समावेशक प्रतिनिधींची समन्वय समितीची निर्मिती करावी असे आवाहन नाशिकच्या पोलीस उपायुक्त मोनिका राऊत यांनी केले. त्या निमाच्या वतीने आयोजित औद्योगिक वसाहतीतील समस्या, वाहतुक, अतिक्रमणे, माथाडी कामगार संघटनाकडून होत असलेला उद्योजकांचा छळ, महिला कामगारांची सुरक्षा, कामगारांची बनावट लिस्टद्वारे कामगार संघटना तर्फे होणाराञास, औद्योगिक वसाहती कायदा सुव्यवस्था संबंधित आदी विषयावर चर्चा करण्यासाठी निमा हाऊस येथे आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, आयामाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, राजेंद्र अहिरे, राजेंद्र वडनेरे, गोविंद झा, निमा उपाध्यक्ष आशिष नहार, केएसबीचे उपाध्यक्ष मोहन पाटील, राजेंद्र वडनेरे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख, सातपूरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज भालेराव, अंबडचे पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे आदी उपस्थित होते.

यावेळी मोनिका राऊत यांनी उद्योजकांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद देऊन त्यावर विशेष लक्ष घालून लवकर कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

त्याचप्रमाणे वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नाशिक पोलीस आयुक्तालयातील सायबर सेल अत्याधुनिक सोयी सुविधानी कार्यरत आहे. त्यामुळे सायबर गून्ह्याची तक्रार विना विलंब करावी असे त्या म्हणाल्या. आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी अंबड औद्योगिक वसाहतीसह शहरातील मुख्य रस्त्यांच्या वाहतुक व अतिक्रमणे या समस्यांवर उपाय योजना करण्याची मागणी केली.

याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे संजय सोनवणे यांनीही काही सूचना केल्या. निपमचे सरचिटणीस हेमंत राख यांनी एचआर व आयरच्या बाबतीमध्ये आपले सूचना मांडल्या. मोहन पाटील यांनी नाशिक शहर पुणे, मुंबई नंतर विकासाच्या दिशेने गरुड झेप घेत आहे. श्रीधर व्यवहारे यांनी येणाऱ्या सणासुदीच्या काळामध्ये करावयाचे प्रतिबंधात्मक उपाय यावर आपले मत मांडले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्र संचालन राजेंद्र अहिरे यांनी तर उपस्थितांचे आभार आशिष नहार यांनी केले. कार्यक्रमास मनीष रावल, हेमंत खोंड, विराज गडकरी, निपमचे सरचिटणीस हेमंत राख, आयमाचे माजी अध्यक्ष ज्योतिराव वाघ, प्रकाश गुंजाळ, सुहास डोईफोडे, विजय जोशी, गोविंद बोरसे, लोकेश पीचया, तुशित बनकर, श्रीकांत पाटील, वाईनरी असोसिएशनचे राजेश जाधव, राजेश बोरसे, महाराष्ट्र चेंबरचे नाशिक शाखा अध्यक्ष संजय सोनवणे, प्रशांत कासलीवाल, मिथीलेश वैद्य, नितीन वडगावकर, गोरख पगार, चेतन पाटील आदिऊसह ५० ते ६० उद्योजक व उद्योग प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते.

न्यूज कॉलम

करिअर कट्टांतर्गत विद्यार्थ्यांशी पाटील महाविद्यालयात संवाद

धुळे । राज्य उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्रातर्फे करिअर कट्टा उपक्रमांतर्गत अँड. झेड. बी. पाटील महाविद्यालयात राज्य समन्वयक यशवंतराव शितोळे यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. पी. एच. पवार, उपप्राचार्य प्रा. व्ही. एस. पवार, उपप्राचार्य डॉ. डी. के. पाटील यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयातील करिअर संसद सदस्यांना मान्यवरांच्या हस्ते करिअर कट्टा माहितीपुस्तक व बॅजेसने सन्मानित करण्यात आले. श्री. शितोळे म्हणाले, की महाविद्यालयीन जीवनातील कालखंड मौल्यवान असून, यशस्वी जीवनासाठी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासासोबत व्यावसायिक व कौशल्य शिक्षण प्राप्त करावे. कौशल्यप्राप्तीसाठी चांगली पुस्तके वाचावीत. जीवनातील ध्येय निश्चित करून परिश्रम घ्यावे. प्राचार्य डॉ. पवार म्हणाले, जिल्हा करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. गिरासे यांनी सूत्रसंचालन केले.

शिवसेना मध्य नाशिक विधानसभा पदाधिकारी बैठक संपन्न

नाशिक । प्रतिनिधी

मध्य नाशिक शाखा प्रमुख

तुषार सानप, गोविंद इंगळे, रामू गायकवाड, हेमंत दळवी, हर्ष चव्हाणके, यश शेलार, सत्यम चोथे, विजय कोटकर, शुभम जाधव, अजिंक्य यार्दी, गोरख बंद्रे, राजेश गीते, दिपक डहांनके, विजय खरात, मयूर कांबळे, धनराज राठोड, श्रवण तेजाळे, अनाज शेख, कार्तिक जेजुरकर, गोपाल गरड, चेतन ससाणे, रवी तांदळे, ज्ञानेश्वर पाटील, अमोल शार्दुल, गौरव शिंपी, गौरव होळकर, रमाकांत चांवडके, ऋषी मंडलिक, गुफरान शेख, संदीप निरभवणे, सागर जाधव, विश्वनाथ कांबळे, भिमराव तीनगोटे

मध्य नाशिक विभाग प्रमुख

प्रसाद (शिवा) जोशी, देविदास बागुल, संदीप जाधव, तेजस कर्पे, काशिद पिरजादे, प्रशांत निचळ, आकाश गरुड, राजाभाऊ पवार, हेमंत पापळे, आशिष सुनिल चिडे, इनायत शाह आदी.

मध्य नाशिक उपविभाग प्रमुख

तुषार गिरी, वैभव पळसकर, निलेश श्रीराम भार्गवे, विशाल देवकर, विवेक जवजाळे, नितीन लासुरे, शंकर केसोलीकर, अभिमन्यू पवार, निखील जाधव, अनिल निरभवणे, प्रेम पाटील, निलेश गांगुर्डे, ऋषिकेश दिवटे, बाबू नाईक, आकाश दाणी, संतोष ढमाले, किशोर रोकडे, संदीप शिर्के आदी.

शिवसेना मध्य नाशिक विधानसभा शिवसेना पदाधिकारी बैठक शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत काल मु. श. औरंगाबादकर सभागृह, नेहरू गार्डन येथे संपन्न झाली. या बैठकीस शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रविण तिदमे, माजी नगरसेविका सुवर्णा मटाले, मेघा साळवे, अस्मिता देशमाने, जिल्हा संघटक योगेश चव्हाणके, युवासेना विस्तारक योगेश बेलदार, सचिन भोसले, नितीन साळवे, योगेश म्हस्के, मध्य विधानसभा उप जिल्हाप्रमुख शशिकांत कोठुळे, अमोल सूर्यवंशी, महेश जोशी, मध्य विधानसभा प्रमुख रोशन शिंदे, उप महानगर प्रमुख आनंद फरताळे, उमेश चव्हाण, नाना काळे, जितेंद्र धनवटे, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, अंबादास जाधव, युवासेना महानगर प्रमुख दिगंबर नाडे, जिल्हा चिटणीस आदित्य बोरस्ते, उप जिल्हाप्रमुख विशाल खैरनार, उप महानगर संघटक अमोल जोशी, संदीप डहांणके, गौरव पगारे, विनोद थोरात, विद्यार्थी सेना जिल्हाप्रमुख किरण फडोळ, महानगरप्रमुख शुभम पाटील, अमोल कंगले, मयूर तेजाळे, भिवानंद काळे, दिलीप अहिरे, सनी रोकडे, विशाल साळवे, योगेश वाणी, शंतनू सौंदानकर, प्रशांत आढाव, नितीन देशमुख, ज्योती फड, सरला चव्हाण, कावेरी अत्रे, आरती गायखे, आरती कांगुणे, वैशाली मंडलिक, अंकिता घोरपडे, कल्पना कांबळे, सविता तपासे, धनश्री जावरे, आशिया खतिब, शरदचंद्र नामपूरकर आदी शिवसैनिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला शिवसेना नाशिक जिल्हा पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांचा नाशिक मध्य विधानसभेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच शिवसेना, युवासेना, अंगीकृत संघटना पदाधिकाऱ्यांचा परिचय करून देण्यात आला. शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी मध्य नाशिक विधानसभेची भोगोलिक रचना व माहिती दिली यात, मध्य नाशिक विधानसभा हि मिश्र लोकवस्ती असलेल्या विभागात जुने नाशिक, भद्रकाली, दुधबाजार, व्दारका, काठेगल्ली, आंबेडकरनगर, उपनगर, सरडा सर्कल, अशोक स्तंभ, पंडित कॉलनी, जुना गंगापूर नका, गंगापूर रोड अशी सर्व धर्मीय लोकांचा समावेश असलेली विधानसभा आहे. नाशिक महानगरपालिकेत २०१७ शिवसेनेचे अनेक उमेदवार फार थोड्या मतांनी पराभूत झाले, त्यामुळे आगामी काळात शिवसेनेची संघटनात्मक बांधणी बघता मध्य नाशिक विधानसभेत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असल्याने पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी केले.

पक्ष निरीक्षक हेमंत पवार यांनी मध्य नाशिकच्या शिवसेना पदाधिकाऱ्यांचा परिचय करून घेतला. शिवसेनेचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेसाठी विविध योजना राबवत असून १८-१८ तास काम करत आहेत. ठाणे जिल्ह्यानंतर त्यांचे सर्वाधिक लक्ष नाशिक जिल्ह्यावर आहे. नाशिक जिल्ह्यासाठी सर्वसामान्य जनतेसाठी काय देता येईल यासाठी त्यांच्या विविध विभागांशी चर्चा सुरु असून लवकरच या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिक येथे येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच संघटनात्मक पातळीवर नाशिकमध्ये लवकरच शिवसेना उत्तर महाराष्ट्र पदाधिकारी शिबीर देखील नाशिकमध्ये घेणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

शिवसेना नाशिक मध्य विधानसभा बैठकीत निवड झालेल्या मध्य नाशिक मधील ११ विभाग प्रमुख, १८ उप विभाग प्रमुख, ३३ शाखा प्रमुख पदाधिकाऱ्यांना त्यांचे नियुक्ती पत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

विद्याधन महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची जयंती साजरी

धुळे । प्रतिनिधी

येथील शारदा शैक्षणिक सामाजिक संस्थेचे विद्याधन महाविद्यालय वलवाडी धुळे येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव चा नामविस्तार वर्धापन दिवस साजरा करण्यात आला. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. आर बी पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख वक्ते कुडा काकोडे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब कुलकर्णी यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यसंग्राबद्दल माहिती दिली. विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. के बी पाटील यांनी बहिणाबाईचे स्वतःचे गाव तिथला परिसर तिथली बोलली जाणारी खानदेशी / लेवा गणबोली भाषा त्यांच्या काव्यातून जिवंत होते. त्या स्वतः शेतकरी जीवन जगत असल्याने शेती जमीन शेतकऱ्यांची सुखदुःखे त्यातले चढउतार झाडंप्रती निसर्ग या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाचा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यप्रसंगी संस्थेचे सचिव हर्षल पाटील, कार्यक्रम अधिकारी डॉ योगेश बोरसे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. जागृती पाटील, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी प्रा. ललिता निकम, प्रा. भूषण पाटील, प्रा. नवसारे, प्रा. वसुधा अहिरे, प्रा गौरी खैरनार, प्रा. रूपाली पाटील प्रा मानसी पाटील, प्रा पल्लवी चौधरी, जयेश देवरे, स्वप्नील पाटील, आकाश, नितीन पाटील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

एस.व्ही.के.एम. स्कूल मध्ये स्वातंत्र्य दिन साजरा

शिरपूर । श्री विलेपार्ले केळवाणी मंडळ संचलित धुळे येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

मुख्याध्यापिका सुनंदा मेनन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सूत्रसंचालन इयत्ता बारावीतील सृष्टी मोराणकर व दहावीतील वंश हरसोत यांनी केले. मुख्याध्यापिका सुनंदा मेनन यांनी स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देत समता आणि प्रगती या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. इयत्ता पाचवीतील हिताक्षी वाधवा हिने हिंदी तर इयत्ता सातवीतील आयुषी देवरे यांनी इंग्रजीतून भाषण करून राष्ट्राप्रती एकता आणि जबाबदारीचे महत्त्व पटवून देवून सर्वांना मंत्रमुग्ध केले. देशभक्तीपर गीतावर संगीत व नृत्य सादर करण्यात आले.चित्र रेखाटन व लेखन कार्य कलाशिक्षक संजय गलवाडे व वृषाली मांडरे यांनी केले. मुख्याध्यापिका सुनंदा मेनन, उपमुख्याध्यापिका रिचा तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली रजत जैन, विभा पंजाबी, मुनमुन दत्ता, माधव साळवे, विरेंद्र सैदाणे, संकेत रुद्र, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

पशुसंवर्धन विभागाच्या सी.आर.सिस्टीमचे जिल्हाधिकारी गोयल यांच्या हस्ते उद्घाटन

धुळे । प्रतिनिधी

धुळे जिल्ह्यातील पशुपालकांच्या पशुधनावर सुयोग्य उपचार व रोगनिदान करण्यासाठी डिजिटल एक्स-रे व रेडिओलॉजी सी.आर.सिस्टीमचे उद्घटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते संपन्न झाले.

या कार्यक्रमास जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. रमेश शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. लंघे, जिल्हा रोगनियंत्रण अधिकारी डॉ. वाडीले, सहाय्यक आयुक्त डॉ. भणगे तसेच जिल्हा पशु सर्वचिकित्सालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी श्री.गोयल म्हणाले की, सन २०२२-२०२३ मध्ये लंपी पशुचर्मरोग नियंत्रणकामी प्राप्त झालेल्या १ कोटीच्या रोगनिदान सुविधा अंतर्गत हे अत्याधुनिक डिजिटल एक्स-रे व रेडिओलॉजी मशीन खरेदी करण्यात आले असून यामुळे पशूधनावरील अस्थिभंग, अस्थिविकार व इतर आजारांचे अतिशय सुस्पष्ट निदान होण्यास मोलाची मदत होणार आहे. यामुळे पशुपालकांना त्यांच्या मौल्यवान पशुधनावर सुयोग्य उपचार करणे व रोगनिदान करता येणार आहे. तसेच येत्या काळात आवश्यकतेनुसार अशा विविध साधनसामग्रीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच सर्व उपकरणे व सामग्री व्यवस्थित पद्धतीने सुरू राहतील अशा सूचना त्यांनी दिल्यात. धुळे जिल्ह्यातील पशुपालकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. रमेश शिंदे यांनी केले आहे.

टेकवाडे येथील विद्यालयात पालक शिक्षक मेळावा संपन्न

शिरपूर । प्रतिनिधी

तालुक्यातील टेकवाडे येथे आर.सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पालक शिक्षक मेळावा संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एन. सी. पवार होते. मेळाव्यास टेकवाडे, टेंभे, खामखेडा, भरवाडे व जुने लोंढरे येथील पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल यांनी टेकवाडे सारख्या ग्रामीण भागात अद्ययावत अशा प्रकारच्या सोयी, सुविधा, सुसज्ज इमारत, संगणक कक्ष, विज्ञान कक्ष, अनुभवी व तज्ञ शिक्षक, संगणक शिक्षक व सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त करुन संस्थाध्यक्षांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. एच.भलकार यांनी केले. प्रास्ताविक पर्यवेक्षक के. बी.चौधरी यांनी केले. एस.एम. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य एन.सी. पवार यांनी शालेय उपस्थिती व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व्हावा यासाठी पालकांनी सहकार्य करावे अशा प्रकारचे आवाहन केले. या पालक मेळाव्यात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी पालक शिक्षक संघाची कार्यकारणी गठीत करण्यात आली. मेळावा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

निजामपूर इंदिरानगर येथे एचआयव्ही जनजागृती

जैताणे । प्रतिनिधी

प्राथमिक आरोग्य केंद्र जैताणे अंतर्गत उपकेंद्र निजामपूर इंदिरानगर येथे एचआयव्ही एड्स याविषयी जनजागृती करण्यात आली.

आरोग्य कर्मचारी साक्री ग्रामीण रुग्णालय दीपक सूर्यवंशी यांनी ६ गरोदर माता व इतर २४ लाभार्थी यांची चाचणी करण्यात केली. आरोग्य कर्मचारी सी जे सोनवणे, गटप्रर्वतक रत्ना जाधव, आशा अनिता चौधरी, प्रियंका बोरसे, निलेश आढाव आदी उपस्थित होते.

धुळे बाजार समितीत ध्वजारोहण सभापतींकडून शेतकऱ्यांना शुभेच्छा

धुळे । प्रतिनिधी

धुळे कृषी उत्पन्न बाजार समितीत स्वातंत्र्यदिनी सभापती बाजीराव पाटील आणि संचालक विश्वास शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव देशभरात उत्साहात साजरा करण्यात येत आहे. दि.१५ऑगस्ट२०२३ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्ताने बाजार समितीत ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील आणि संचालक विश्वास शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमात बाजार समितीचे चेअरमन बाजीराव पाटील यांनी शेतकर्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. झेंडावंदनाच्या कार्यक्रमाला उपसभापती योगेश पाटील, संचालक एन.डी. पाटील, कुणाल पाटील, रावसाहेब पाटील, महादेव परदेशी, ऋषीकेश ठाकरे, भटू गिरासे, प्रभारी सचिव देवेंद्र पाटील, सहाय्यक सचिव विशाल आव्हाड, देवेंद्रसिंग सिसोदिया, माजी सरपंच भटू गिरासे, भगवान पाटील यांच्यासह संचालक मंडळ व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

वनावल येथे माझी माती माझा देश कार्यक्रम अंतर्गत भव्य वृक्षारोपण व वृक्षदिंडी

शिरपूर । प्रतिनिधी

येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट रिसर्च अँड डेव्हलपमेंट च्या राष्ट्रीय सेवा योजना एकका द्वारे व वनावल ग्रामस्थ यांच्या सहकार्याने दत्तक गांव वनावल येथे माझी माती माझा देश कार्यक्रम अंतर्गत दि. ९ ऑगस्ट २०२३ रोजी परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षदिंडी व भव्य वृक्षारोपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेण्ट रिसर्च ण्ड डेव्हलपमेंट च्या राष्ट्रीय सेवा योजना एककाकडून एकूण ५७ स्वयंसेवकांनी यशस्वीपणे सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे वृक्षांचे महत्त्व जाणून घेणे, वृक्षारोपणा संबंधी गावातील युवकांमध्ये जनजागृती करणे, वृक्ष संवर्धन व पर्यावरण संवर्धन करणे. पंचप्राण शपथविधी सोहळा हे या उपक्रमाचे एक वैशिष्ट्य होते. सोबत राष्ट्रीय स्वयंसेवकांनी व गावातील नागरिकांनी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याची शपथ घेतली.

गावात वृक्षदिंडीचा कार्यक्रम आयोजन करून विविध पर्यावरण पूरक, वृक्षारोपण संबंधी घोषणा देऊन जनजागृती केली. कार्यक्रमात जिल्हा परिषद मराठी शाळा वनावल येथील विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदविला. गावातील मान्यवरांच्या हस्ते, माजी स्वातंत्र्य सैनिकांच्या हस्ते विविध ठिकाणी वृक्षारोपण झाले. झाडांचे महत्त्व, वनसंवर्धनाचे फायदे आणि वृक्षांचे संवर्धन करण्याचे मार्ग यावर चर्चा करण्यात आली. वृक्षारोपण उपक्रमासाठी परिसंस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी रोपे लावली. या रोपांचे संवर्धन करण्याची जबाबदारी इन्स्टिट्यूटकडे असून त्या परिसरातील ग्रामस्थ देखील या उपक्रमास उत्साहाने सहकार्य करीत आहेत. वृक्षारोपणाच्या उपक्रमात सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रमासाठी गावातील सामाजिक क्षेत्रातील, राजकीय क्षेत्रातील, शैक्षणिक क्षेत्रातील व ग्रामपंचायत येथील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, गावातील नागरीक तसेच जिल्हा परिषद मराठी शाळा वनावल येथील मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, प्रा. मनोज बेहेरे, डॉ. मनोज पटेल, डॉ. तुषार पटेल, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. योगेश शेठिया, प्रा. विजय गर्गे, प्रा. विठ्ठल पाटील, प्रा. पूजा जैन, प्रा. मोनाली किरंगे आदींचे विशेष सहकार्य लाभले.

गणवेशासाठी जैन ट्रस्टचे अर्थसहाय्य

धुळे । प्रतिनिधी

धुळे जिल्ह्यासह राज्यात गेल्या ४२ वर्षापासून दिव्यांगांसाठी सेवारत (स्व.) रतीबाई मगनलाल जैन पब्लिक ट्रस्टकडून लहान वयोगटातील विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम हाती घेतले जातात. गेल्या वर्षी शिवाजी हायस्कूलमध्ये १३३ विद्यार्थ्यांना ट्रस्टतर्फे थंडीच्या दिवसांत ब्लॅकटवाटप करण्यात आले. यंदा भावे स्कूलमधील दोनशे गरीब विद्यार्थ्यांना ट्रस्टतर्फे गणवेश वितरित झाले.

पाहिजेत

कार्यालयीन/ऑफीस कामकाजाकरिता मराठी, इंग्रजी टंकलेखक तसेच संगणकाचे Tally,Execl, Word चे ज्ञान असलेले मुलगा/मुलगी कामकाजाकरिता तात्काळ पाहिजेत.

: संपर्क :

ॲड.विलास डी.झाल्टे/ ॲड.सिध्दांत व्ही.झाल्टे

पत्ता: १५,१६ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, स्टेशन रोड, धुळे.

मो:९१५६२६९९९९ भेटण्याची वेळ : १२ ते ६ पर्यंत

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

वीरजवानांच्या कुटुंबियांना सन्मानपत्र देऊन केला गौरव

धुळे । प्रतिनिधी

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी 'मिट्टी को नमन, वीरों का वंदन' या घोषवाक्यासह जिल्हाभरात 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' या अभियानाचा धुळे मुख्यालयातील ग्रामपंचायतस्तरावरील सांगता समारंभ संपन्न झाला. धुळे पंचायत समिती येथील कार्यक्रमात १४२ गावांतुन आणलेले मातीचे कलश आणले आहे. हे फक्त मातीचे कलश नसुन शहिदांच्या बलिदानात पावन झालेले कलश असल्याचे त्यांनी सांगितले. मेरी माटी, मेरा देश उपक्रमातंर्गत शासनाने ठरविल्याप्रमाणे पंचसुत्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक ग्रामस्तरावर जे विविध उपक्रम राबविले ते अंत्यत चांगले प्रकारे राबविले. त्यामुळे संपुर्ण जिल्ह्यात देशभक्तीपर वातावरण निर्माण होवून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तींची भावना निर्माण झाली आहे. हा उपक्रम अतिशय चांगल्या प्रकारे राबविण्याबद्दल त्यांनी सर्व जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचारी, सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थांचे आभार मानले. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा श्रीमती अश्विनी पवार, माजी सभापती अरविंद जाधव, सरपंचांचे प्रतिनिधी रावसाहेब गिरासे तसेच स्वातंत्र्यसैनिक पत्नी श्रीमती कमलबाई माळी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

'मेरी माटी, मेरा देश' अभियानाचा सांगता समारंभ संपन्न

धुळे । स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त देशासाठी बलिदान दिलेल्या शहीद वीरांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आणि नमन करण्यासाठी 'मिट्टी को नमन, वीरों का वंदन' या घोषवाक्यासह जिल्हाभरात 'मेरी माटी, मेरा देश' अर्थात 'माझी माती, माझा देश' या अभियानाचा धुळे मुख्यालयातील ग्रामपंचायतस्तरावरील सांगता समारंभ आज पंचायत समिती, धुळे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. धुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अश्विनी पवार, महापौर प्रतिभाताई चौधरी, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता, मनपा आयुक्त देविदास टेकाळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपमुख्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) गणेश मोरे, प्रदिप पवार, कृषि सभापती हर्षवर्धन दहिते, महिला व बाल कल्याण सभापती संजिवनीताई सिसोदे, जि.प.सदस्य शालिनीताई भदाणे, पंचायत समिती सभापती वंदनाताई मोरे, उपसभापती देवेंद्र माळी, माजी सभापती संग्रामदादा पाटील, अरविंद जाधव, गट शिक्षणाधिकारी सुरेखा देवरे, सहायक गट विकास अधिकारी रावसाहेब पाटील यांच्यासह जिल्हा परिषदेचे सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले की, यावर्षी जिल्ह्यात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्त 'मेरी माटी, मेरा देश' हा उपक्रम ९ ऑगस्टपासून राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत जिल्हाभरात प्रत्येक पंचायतस्तरावर शिलाफलकाची उभारणी, ७५ अमृत रोपवाटिका, तसेच दिल्ली येथे अमृत वाटीका तयार करण्यासाठी प्रत्येक गावातील मातीचे संकलन करण्यात आले आहे. या मातीचे एकत्रित संकलन सर्व पंचायतस्तरावर करुन प्रत्येक पंचायत समितीकडून जिल्हा युवक स्वंयसेवकांकडे जमा करुन दिल्ली येथे 'अमृत वाटिका' तयार करण्यासाठी एक कलश दिल्ली येथे पाठविण्यात येणार आहे. हे आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. 'मेरी माटी, मेरा देश' उपक्रमांतर्गत संपुर्ण जिल्ह्यात चांगले कार्यक्रम झाले आहेत. या उपक्रमात सर्व नागरिक, अधिकारी, कर्मचारी यांनी हा उपक्रम जिल्हाभरात अंत्यत चांगल्याप्रकारे राबविल्याबद्दल यावेळी त्यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

संकलन : दिपक वाघ